# "भारतातील पक्षपद्धती"

[Party system in India]

I] राजकिय पक्षांचा अर्थ आणि व्याख्या :

II] राजकिय पक्षांचे कार्ये :

III] भारतीय पक्षपद्धतीची वैशिष्ट्ये :

IV] भारतीय राजकिय पक्षांच्या समस्या :

शासनपद्धती कोणत्याही स्वरूपाची असो. लोकशाही, साम्यवादी, हुकूमशाही अथवा अन्य कोणतीही. त्या शासनपद्धतीत राजकिय पक्षास महत्वाचे स्थान असते. राजकिय पक्षांशिवाय शासनपद्धतीचा विचारच करता येत नाही. राजकिय पक्ष हा लोकशाहीचा आत्मा आहे "Life blood of Democracy" तो शासनाचा चौथा भाग आहे Fourth organ of the Government. कोणत्याही शासनपद्धतीची सत्ता प्रामुख्याने राजकिय पक्षामार्फतच चालते, राजकिय पक्षांचा अर्थ, व्याख्या, वैशिष्ट्ये, कार्ये याचा अभ्यास खालील प्रमाणे करण्यात येईल.

## I] राजकिय पक्षांचा अर्थ आणि व्याख्या :

[Political parties Meaning and Defination]

राजकिय पक्षांची सर्वसामान्य व्याख्या अशी " विशिष्ट वि[...] मुद्दे, किंवा धोरणे मानणाऱ्या आणि राजकिय सत्ता प्राप्त[...] करेल असणाऱ्या व्यक्तींचा सुसंघटित गट होय" - [संदर्भ - राज्यशास्त्र कोष - पेज - 239 - सुहास पळशीकर] राजकिय पक्षाचे काही राज्यशास्त्रज्ञांनी खालील प्रमाणे व्याख्या केल्या आहेत

I] गेटेल :- "त्यांच्या मते कमी अधिक प्रमाणात सुसंघटित असलेला व्यक्तींचा गट की जो मतदानाच्या माध्यमातून शासन संस्थेवर नियंत्रण प्रस्थापित करणे किंवा शासन तयार करणे स्वतः ठरविलेल्या ध्येय - धोरण आणि कार्यक्रम राबविण्यासाठी कटिबद्ध असतो. त्याला राजकिय पक्ष असे म्हणतात

II] एडमंड बर्क :- "त्यांच्या मते राजकिय तत्त्वज्ञानाच्या बाबतीत एकमत असलेला आणि संघटितरित्या राष्ट्रीय हितसंबंधाची जपणूक करणारा लोकसमूह म्हणजे राजकिय पक्ष होय"

III] गिलक्राईस्ट :- "त्यांच्या मते राजकिय पक्ष म्हणजे अशा व्यक्तींचा समूह की त्या समूहातील सर्व सदस्यांचे राजकिय विचार समान असतात हा समूह एक राजकिय संघटनेच्या स्वरूपात कार्य करतांना शासन सत्ता आपल्या हातात घेत असतो"

राजकिय पक्ष हा दबावगटापेक्षा वेगळा असतो राजकिय पक्ष आणि दबावगटांचे कार्य हे वेगवेगळे असते राजकिय पक्षांचे कार्य - I सत्ता प्राप्त करणे II हितसंबंधाचे सुसूत्रीकरण करणे III राजकिय भरती करणे IV राजकिय संसूचन V शासनसत्तेवर टिका करणे इत्यादी

राजकिय पक्षांच्या कार्यक्षमतेसाठी काही मुलभूत तत्वे :- (I) पक्षांची संघटना मजबूत असली पाहिजे (II) राजकिय पक्षांची एक समान कायमस्वरूपी राजकिय विचारप्रणाली असावी (III) सत्ता प्राप्त अथवा उद्देश प्राप्ती साठी शांततापूर्ण आणि घटनात्मक साधनांचा उपयोग. (IV) राष्ट्रीय हित संवर्धनासाठी आवश्यक असे धोरण. इत्यादी

## II] राजकिय पक्षांचे कार्य :-

[Functions of political parties]

लोकशाही मध्ये राजकिय पक्षांचे कार्य महत्वाचे आहे. मेरियमच्या मतानुसार राजकिय पक्षांचे कार्य पाच आहेत (I) पदाधिकाऱ्यांची निवड करणे. (II) धोरण निर्मिती (III) शासनाचे नियंत्रण आणि टीका करणे (IV) राजकिय प्रचार आणि शिक्षण. (V) व्यक्ती आणि शासन यामधील दुवा साधणे इत्यादी सर्व साधारण राजकिय पक्षांची कार्ये खालील प्रमाणे आहेत

I] सार्वजनिक धोरण निर्धारण करणे :- सत्ता प्राप्त केल्यानंतर राजकिय पक्ष आपल्या ध्येय धोरणानुसार तसेच देशातील आर्थिक, राजकिय, सामाजिक, बेकारी, शैक्षणिक इत्यादी समस्यांचा विचारपूर्वक जनहितासाठी योग्य ते धोरण निर्माण करते व जनतेचा पाठिंबा मिळविते

II] शासनावर नियंत्रण करणे :- निवडणूकीत ज्या पक्षाला बहुमत प्राप्त झाले आहे तो पक्ष आपले मंत्रिमंडळ निर्माण करून सत्ता आपल्या हाती घेऊन निवडणूक जाहिरनाम्यातील

सत्ता प्राप्त करणे
ध्येय धोरणांचा प्रचार करणे
राजकिय शिक्षण प्राप्त करणे

...मारवालने पूर्ण करण्याचा प्रयत्न करतो

III शासनावर टिका करणे :- ज्या पक्षाला बहुमत मिळाले नसते असा पक्ष अन्य विरोधी पक्ष महत्त्वाचे कार्य करतो सत्ताधारी पक्षांच्या चुकीच्या धोरणावर टिका करून त्या जनतेसमोर मांडून जनतेचा पाठिंबा मिळवून पुढच्या निवडणुका जिंकण्याचा प्रयत्न करतो

IV निवडणूक लढविणे :- प्रत्येक राजकीय पक्ष निवडणूकीत बहुमत प्राप्त करण्यासाठी आपल्या पक्षांची संघटना मजबूत करणे, पक्षाधिकाऱ्यांची योग्य निवड करणे, निवडणूक जाहिरनामा तयार करून आपल्या पक्षांचे ध्येय, धोरण, कार्यक्रम यांचा जनतेमध्ये प्रचार करून निवडणूक लढविली जाते

V शासन आणि जनतेमध्ये दुवा म्हणून कार्य :- राजकीय पक्ष शासन आणि जनतेमध्ये मध्यस्थीतीचे कार्य करते. जनतेच्या गरजा आकांक्षा आणि मागण्या शासनापर्यंत नेऊन पोहोचविणे आणि शासनाचे ध्येय-धोरणांची अंमलबजावणी करून जनतेपर्यंत पोहोचविणे हे कार्य राजकीय पक्षांचे आहे

VI जनतेला राजकीय प्रशिक्षण देणे :- राजकीय पक्ष सभा संमेलने, व्याख्याने, घोषणा, निवेदने, वर्तमानपत्रे आदीद्वारे लोकांना राजकीय माहिती देऊन लोकांमध्ये राजकीय प्रशिक्षण व राजकीय जाणिवा निर्माण करण्याचे कार्य करते

VII राजकीय भरतीचे कार्य :-

(x) पक्षीय कार्य
(xi) सामाजिक आणि सांस्कृतिक कार्य — जनतेला सामाजिक आणि सांस्कृतिक शिक्षण देणे
(xii) लोकमत निर्माण करणे

संसदीय आणि अध्यक्षीय शासनपध्दतीमध्ये राजकीय सत्तारूढ पक्षाला निरनिराळ्या शासकीय आणि राजकीय पदांसाठी आपल्या उमेदवारांची निवड करावी लागते उदा. भारतात सत्तारूढ असलेला राजकीय पक्ष राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, लोकसभेच्या सभापती. इत्यादी

III] भारतातील पक्षपध्दतीची वैशिष्ट्ये :-

भारतीय पक्षपध्दतीची वैशिष्ट्ये खालील प्रमाणे आहेत. -

I] बहुपक्षपध्दती :- भारतात इंग्लंड अथवा अमेरिकेसारखी द्विपक्षपध्दती नाही तर बहुपक्षपध्दती आहे. बहुपक्षपध्दती असण्याचे मुख्य कारण येथील सांस्कृतिक विविधता आहे. भारतात सहा राष्ट्रीय पक्ष, 58 राज्यस्तरीय तसेच इतर अनेक आहेत.

II] एक पक्ष प्रभुत्व :- स्वातंत्र्य लढ्यात अधिमान्यता पावलेली काँग्रेस ही स्वातंत्र्यानंतर राजकारणात यशस्वी झाली कारण काँग्रेसला वेगवेगळ्या जाती, धर्म आणि वर्गांचा पाठिंबा होता, त्यामुळे काँग्रेसचे प्रभुत्व 1947 ते 1977 पर्यंत कायम होते अन्य राजकीय पक्ष असले तरी त्यांच्यात काँग्रेसला विरोध करण्या इतपत ताकद नव्हती.

III] पक्षीय राजकारण नेतृत्वावर आधारित :- भारतात पक्षीय राजकारण नेतृत्वावर आधारित आहे 1947 ते 1964 नेहरू नंतर इंदिरा गांधी, त्यानंतर राजीव गांधी आता आजपर्यंत वाजपेयी यावर अवलंबून आहे

IV] राजकीय पक्षात विभाजन आणि विघटन :- भारतातील राज पक्षात पक्ष विभाजन, विघटनाची प्रवृत्ती आहे. उदा. कॉंग्रेस, समाजवादी, जनता दल इत्यादी - 1969 - कॉंग्रेसचे विभाजन, 1995 - कॉंग्रेसचे पुन्हा विभाजन, 1999 - राष्ट्रवादी कॉंग्रेस

V] शक्तिशाली विरोधी पक्षांचा अभाव :- भारतीय राजकारणात आरंभीपासून शक्तिशाली विरोधी पक्षांचा अभाव आहे. कॉंग्रेस हा एकमेव प्रभुत्वशाली पक्ष होता. अन्य जरी अनेक पक्ष असले तरी त्यांच्यात प्रभाव नव्हता. म्हणून 1989 पर्यंत प्रभावी विरोधी पक्ष नव्हता. आता आहे - अलीकडे 1997 नंतर विरोधी पक्षांचे अस्तित्व

VI] राजकीय पक्षांच्या ध्येय-धोरणात स्पष्टता नाही :- कार्यक्रमात राजकीय पक्षांचे स्पष्ट असे ध्येय धोरण नाही. त्यात वारंवार बदल होतो. कधी येईल तसा आपल्या पक्षाचा प्रचार-प्रसार करतात. एकंदरित सर्व पक्षांचे धोरण सारखेच आहे.

VII] जातीवादी आणि प्रादेशिक पक्ष :- भारतात भाजपा, अकाली दल, मुस्लिम लीग, भारतीय जन परिषद, मिझो नॅशनल कॉन्फरन्स, द्रमुक - अण्णा द्रमुक इत्यादी जातीवादी पक्ष तर अनेक प्रादेशिक पक्ष आहेत.

VIII] पक्ष बदलांचे वाढते प्रमाण, IX पक्षांची संधीसाधू वृत्ती इत्यादी.

III भारतीय राजकीय पक्षांच्या समस्या :-

I मजबूत पक्ष संघटना नाही II पक्ष बदलाची प्रवृत्ती III योग्य नेतृत्व नाही IV पक्षांमध्ये जातीवाद व प्रदेशवाद वृत्ती. V वित्तीय समस्या. VI निवडणुकीत वापरल्यात येणारा काळा पैसा. VII राजकीय गुन्हेगारीकरण. VIII पक्षांची वाढती प्रादेशिक स्वार्थी वृत्ती इत्यादी

## भारतीय पक्षपद्धतीची वैशिष्ट्ये

**१) राजकीय पक्षांतर्गत गटबाजी प्रवृत्ती :-**

हे एक महत्त्वाचे वैशिष्ट्ये आहे भारतीय पक्षपद्धतीचे पक्षांतर्गत सर्वच पक्षात जास्त गटबाजी प्रवृत्ती आढळते एक सत्ताधारी पक्षात आणि दुसरे म्हणजे विरोधी पक्षात सध्याच्या संयुक्त आघाडी सरकार मध्ये तर १९ पक्ष आहेत. काँग्रेस पक्षात तर ही प्रवृत्ती जास्त दिसते आणि गटबाजी पक्ष सत्तेच्या कारण म्हणजे सत्ता प्राप्त करण्यासाठी

**२) राजकीय पक्षांत - बदल - दल-बदलाची प्रवृत्ती**

**३) अपक्ष उमेदवारांची वाढती संख्या**

इंडियन नॅशनल काँग्रेस (काँग्रेस पक्ष)
(Congress) (Congress)

इतिहास.

ए.ओ. ह्यूम
1885

ब्रिटिश राजवटीच्या काळात, भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना 1885 साली झाली. स्वातंत्र्य प्राप्तीसाठी या राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना झाली. राष्ट्रीय काँग्रेसमध्ये विविध जात, धर्म, वर्ग, शेतकरी, व्यापारी, भांडवलदार, विविध विचारांचे, अथवा समाजाच्या सर्व स्तरातील लोक त्यात सहभागी होते. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर या पक्षातून अनेक लोक बाहेर पडून वेगवेगळ्या पक्षांची स्थापना ~~करण्यात आली~~ केली. तरीपण ~~स्थापनेपासून~~ स्थापनेपासून आतापर्यंत देशाची सत्ता कांही अपवाद वगळता 1989 पर्यंत काँग्रेसकडेच होते. 1990 नंतरच्या दशकात राजकारणात अनेक ~~प्रादे~~ प्रादेशिक पक्ष बळकट झाले असले तरी आजही राष्ट्रव्यापी अस्तित्व व कार्य या पक्षाचा अजूनही टिकून ठेवता आले आहे.

"पक्षाची संघटना"

काँग्रेस पक्षाची संघटना पिरॅमिड सारखी आहे. पक्षाची एक सर्वोच्च स्थानावर अध्यक्षांची कार्यकारिणी समिती असते. त्यात अध्यक्ष, कोषाध्यक्ष, सचिव आणि इतर सभासद असतात. या समितीत निवडलेले, पदसिद्ध, आणि काय स्वीकृत सदस्य आणि काँग्रेसचे पूर्व अध्यक्ष इत्यादींचा समावेश होतो.

संघटनात्मक बांधणी

प्रत्येक घटकराज्यासाठी एक प्रदेश समिती, जिल्ह्यासाठी जिल्हा काँग्रेस, तालुक्यासाठी तालुका काँग्रेस समिती, गावासाठी ग्राम समिती, युवकांसाठी युवक काँग्रेस संघटना किंवा युवा काँग्रेस समिती निर्माण केली आहे

भारतातील कोणत्याही व्यक्तीला 18 वर्षे वय पूर्ण झाल्यानंतर काँग्रेसचे प्राथमिक सभासदत्व स्वीकारता येते.

गांधी पर्व :- (1920 ते 1947)

महात्मा गांधींनी 1920 नंतर काँग्रेस पक्षाला सामान्यांचे सर्वच हक्कांचा आधार मिळवून देण्यासाठी गांधीजींनी स्वातंत्र्य प्राप्त करण्यासाठी काँग्रेसला ~~सामान्यांची~~ कोट्यावधींची [illegible]विली. ही चळवळ केवळ राजकीय स्वातंत्र्याची न राहता तिला रचनात्मक कार्याची जोड मिळून त्याचा स्वराज्याची ही चळवळ व्हावी यावर गांधींचा विशेष भर होता. जनसामान्यांचे प्रश्न घेऊन त्या आधारे सत्याग्रहाचे लढे हाती घ्यायचे, सामान्यांना प्रतीक असे कार्यक्रम द्यायचे आणि त्यातून सामान्य नागरिकांचे आत्मबळ व आत्मविश्वास वाढेल याकडे लक्ष द्यायचे ही गांधींच्या कार्यपद्धतीची खास वैशिष्ट्ये होती.

1920 ते 1947 या कालखंडात काँग्रेसवर गांधीजींचे वर्चस्व असले तरी इतरही क्रांतिकारी, जहाल गटांचे वर्चस्व काँग्रेसवर राहिले आहे.

नेहरू पटेलांचा कालखंड :- (1947 – 1964)

स्वातंत्र्योत्तर काळात पहिल्या दशकात काँग्रेसची सूत्रे नेहरू-पटेलांकडे होती. 1950 ला पटेलांचा मृत्यू झाल्या नंतर नेहरूंच्या प्रतिष्ठेमुळे काँग्रेसपक्षाला कोणतीही उरली नाही काँग्रेसचे सर्वेसर्वा नेहरूच बनले आहेत. त्यामुळे नेहरू

हेच पक्षात आणि शासनात प्रमुख होते. नेहरूंच्या काळात काँग्रेस पक्षाने अध्यक्ष कोण असावे हे तेच ~~ठरवायचे~~ ठरवायचे, इतर महत्त्वपूर्ण पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करणे, मुख्यमंत्र्यांची निवड करणे, देशांतर्गत आणि परराष्ट्र धोरण ठरविणे, पक्षाची वार्षिक अधिवेशने कार्यकारिणीच्या बैठका घेणे इत्यादि बाबतीत तेच ~~सर्वेसर्वा~~ सर्वेसर्वा होते. तसेच त्यांनी आपल्या काळात समाजवादी, लोकशाही विचारांच्या लोकांचा पाठिंबा मिळविण्याचा प्रयत्न केला. पक्षांतर्गत लोकशाहीमुळे व पक्षाच्या कार्यपद्धतीमुळे स्वपक्षाच्या व्यवहारावर त्यांची पूर्ण पकड असल्याचे आढळते.

- श्रीमती इंदिरा गांधींचा कालखंड - (1966) (1964)

नेहरूंच्या ~~नंतर~~ निधनानंतर अल्पकाळातच काँग्रेसची आणि प्रशासनाची सत्तासूत्रे इंदिरा गांधींच्या हाती केंद्रित झाली. मात्र इंदिरांचे काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्यांशी मतभेद झाले. तरीसुद्धा 1971 च्या लोकसभा निवडणूकीत यश मिळवता आले. त्यानंतर शासनात आणि पक्षात त्याच सर्वेसर्वा बनल्या. त्या पक्षात प्रत्यक्षपणे निर्णय घेऊ लागल्या. पक्षातील इतर नेत्यांचा, मंत्रिमंडळाचा विचार न करता त्यांना विश्वासात न घेता एकाधिकारशाहीने निर्णय घेऊ लागल्या. अर्थात तिथूनच भारतीय राजकारणात एकाधिकारशाही निर्माण झाली. श्रीमती इंदिरा गांधींच्या व्यक्तिमत्वाला दिव्यत्वाचे रूप आले तेव्हा 1975 ला राष्ट्रीय आणीबाणी घोषित करून पक्षांतर्गत नेत्यांचा विश्वास गमाविला. त्यामुळे पक्षातील व इतर नेत्यांनी टीका केली. त्याचा परिणाम म्हणून 1977 च्या निवडणूकीत पक्षाचा पराभव झाला.

पक्षांतर्गत लोकशाही संपुष्टात आली होती. इंदिरा गांधी यांच्या सहकाऱ्यांविषयी अविश्वास बाळगत असत. के जगजीवनराम यांनी पक्षाबाहेर पडतांना दाखवून दिले या बाबत पक्षांतर्गत सुप्त वाद आली होती. गटबाजीने पक्ष वरपासून खालपर्यंत पोखरून टाकला होता. पक्षकार्यकर्ते मात्र पोरके झालेले होते. या बाबत पक्षांतर्गत चव्हाण व ब्रह्मानंद रेड्डी यांनी पक्षांतर्गत नेतृत्वावर टिका केली. तरीपण तिने आपल्या समर्थकांकरवी विरोधकांची कोंडी केली.

1980 च्या सार्वत्रिक निवडणुकीत परत इंदिरा काँग्रेसला स्पष्ट बहुमत मिळाले आले. 1984 मध्ये इंदिरा गांधींची हत्या झाली पक्षाची व शासनाची सत्ता सूत्रे राजीव गांधींच्या हाती आली.

राजीव गांधींचा कालखंड. (1984)

1985 साली काँग्रेसने आपली शताब्दी साजरी केली राष्ट्रीय काँग्रेसच्या भूमिकेत नेतृत्वानुसार बदल झालेला आहे युवक काँग्रेस कोणत्याही नेत्या-कार्यकर्त्यांपेक्षा मोठी होती आजची काँग्रेस नेत्यांची अधिक झाली आहे हा सर्वात मोठा फरक असून त्याचा परिणाम पक्षांतर्गत शिस्त, कार्यपद्धती, शासन-पक्ष संबंध, नेते-कार्यकर्ते संबंध पक्षांतर्गत निर्णयपद्धती वगैरे सर्व बाबींवर पडलेला आहे. औपचारिक रचना पूर्ववत असली तरी काँग्रेसच्या भूमिकेत बदल झालेला आहे.

Scanned with CamScanner

२१ मे १९९१ ला ~~संत~~ राजीव गांधींची हत्या झाली त्यानंतर काँग्रेस पक्षाची अधिकच वाताहात झाली. नरसिंहराव यांनी अध्यक्ष व पंतप्रधान झाले पण पक्षाची संघटना किंवा गटबाजी यात सुधारणा झाली नाही.

१९९५- मध्ये नारायण दत्त तिवारी आणि अर्जुनसिंह यांनी स्वतःचा काँग्रेस तिवारी-स्वतः जनहित सामाजिक इंदिरा काँग्रेसची स्थापना केली पण कालांतराने पक्षात परत आले.

१९९९- पर्यंत - सोनिया गांधी परदेशी आहेत या मुद्यावरून ~~काँग्रेस~~ शरद पवार, पूर्णो संगमा काँग्रेस मधून बाहेर पडून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना केली. या काळात सोनिया गांधी पक्षाच्या अध्यक्षा बनल्या पण पक्षाला उर्जितावस्था देऊ शकल्या नाहीत.

सोनिया गांधींचा कालखंड - (२००४)

२००४ पर्यंत सोनिया गांधींना देशाच्या राजकारणावर फारसा प्रभाव टाकता आला पण २००४ च्या सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीत सर्वात जास्त जागा घेवून पक्ष म्हणून काँग्रेस पक्ष पुढे आला. काँग्रेस पक्षाचीच सत्ता स्थापन झाली. अर्थात राष्ट्रीय काँग्रेसच्या अध्यक्षपदी असल्याने सोनिया गांधींची भूमिका महत्त्वाची आहे

સોનિયા ગાંધીએ કોંગ્રેસ પક્ષને મજબૂત, ક્રિયાશીલ બનાવવાની સાથે પુરોગામી પક્ષાંતર આચારસંહિતા કાનૂન, લોકો માહિતી અધિકાર કાનૂન પસાર કર્યા. ત્યારબાદ નિયમ ૨૦૦૫ પછીથી તેનો અમલ કરવા આવી. ઉપરાંત રોજગાર ગેરંટી પાસ કરવામાં આવી. ગામોને પંચાયતદ્વારા તમામ લોકોનો અધિકાર મળી શકે.

આમ ભારતીય રાજકારણમાં પંચાયતવ્યવસ્થામાં મજબૂતમાં મહત્વ પ્રયત્ન કરીને દેશના વિકાસ યોગદાન આપે છે.

भा.ज.प.
(भारतीय जनता पक्ष)
(1980)

डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी २१ ऑक्टोबर 1951 मध्ये दिल्ली येथे 500 प्रतिनिधींच्या समोर जनसंघ या नव्या पक्षाची स्थापना करण्यात आली. 1925 पासून हिंदु धर्मसंस्कृतीच्या प्रसारार्थ झटणाऱ्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचेच राजकीय अंग असल्याची टिका आरंभीपासून टिका केली, मुखर्जींच्या निधनानंतर हा पक्ष रा. स्व. संघाच्या संपूर्ण नियंत्रणाखाली गेला. नंतर तर तो संसदीय राजकारण करण्यात अपयशी ठरला.

भाजपाची स्थापना!

मे. 1980 मध्ये जनसंघाचे नेते - वाजपेयी जनता पक्षातून बाहेर पडून अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली भा.ज.पा. ची स्थापना करण्यात आली. भाजपाच्या स्थापनेत वाजपेयी, अडवाणी, राजमाता शिंदे इत्यादींची महत्वाची भूमिका होती.

प्रारंभी पक्षाची भूमिका!

i) राष्ट्रवाद ii) राष्ट्रीय एकात्मता, iii) लोकशाही,
iv) भावनात्मक धर्मनिरपेक्षता v) गांधीवादी समाजवाद
vi) मूल्याधिष्ठित राजकारण व मुद्यावर राजकारण करण्याचा प्रयत्न केला
vii) शेतीची पुनर्रचना viii) अंत्योदयाच्या योजनेद्वारे दारिद्र्यनिवारण, (9) प्रौढ-शिक्षण (10) ग्रामीण जनतेला पाण्याची सोय (11) कमी खर्चात घरे (12) प्राथमिक आरोग्य (13) कुटुंबनियोजन (14) व्यवसायप्रधान शिक्षण (15) स्त्री कल्याण (16) रोजगार हमी (17) सार्वजनिक

केल्याचा स्वीकार (18) आंतरराष्ट्रीय शांतता व राष्ट्रीय (19) शेजारी राष्ट्रांशी मैत्रीपूर्ण संबंध (20) दारिद्र्य आदिवासी दलितांशी सहकार्य. इत्यादी

## पक्षाची वैचारिक वाटचाल :- (1980 ते 1985)

या काळात लोकशाहीशी सौख्य साधून गांधी हरियाणा, उ.प्र. बिहार, या राज्यांत शहरी मुस्लिम मतदारांचा पाठिंबा मिळविल्याने पक्ष आपले स्थान काँग्रेसला आव्हान देऊ शकला नाही.

प्रा. 1984 च्या इंदौर राष्ट्रीय अधिवेशनात पक्षाने लोकशाही स्वीकारली. त्या अधिवेशनात स्वतः वाजपेयींनी मानवता आणि स्वयं संघात परस्पर संबंध आहे असे घोषित केले. शिवाय - या अधिवेशनात

(1) स्त्रिया, हरिजन, व आदिम जमातींच्या अत्याचारांना वाचा फोडून न्याय मिळवून द्यावे

(2) शेतमालाला वाजवी भाव, शेतमजुरांना योग्य वेतन द्यावे किमान वेतनाचे आयोजन करावे

(3) कल्याणकारी योजनांचे लाभ लोकांपर्यंत पोहोचवावे

(4) अर्थव्यवस्था बळकटीसाठी 10 कलमी कार्यक्रमही जाहीर करण्यात आला.

ऑक्टो. 1984 च्या मुंबई बैठकीत वाजपेयींनी गांधीवादी समाजवादाची संकल्पना घेऊन हिंदुत्वाचा उपाध्याय प्रणित एकात्म मानवतावाद हे पक्षाचे मूलभूत तत्त्वज्ञान म्हणून स्वीकार केला.

डिसेंबर 1984 च्या लोकसभा निवडणुकीत भाजपा दोन जागा मिळाल्या. मार्च 1985 च्या राज्यविधानसभा निवडणुकीत

उ.प्र - (11-16), राजस्थान-(32-38) गुजरात-(9-11) आं.प्र-(3-8) ओरिसा-(0,1) हि राज्ये वगळता मध्यप्रदेश (60-58) हिमाचल प्रदेश (29-7), बिहार (21-12) कर्नाटक (18-2) महाराष्ट्र-(14-13) या राज्यात भाजपा आमदारांची संख्या कमी झाल्याचे दिसते

## 1985 नंतर भाजपाचे नवे वळण:-

1985 मध्ये भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष लालकृष्ण अडवाणी ~~बनले~~ झाले. 1985 नंतर भाजपाने काश्मिर प्रश्न, गोहत्या बंदी, समान नागरी कायदा, कलम 370 रद्द करणे, अल्पसंख्यांकांना वेगळ्या सवलती 'नकारणे', सांस्कृतिक राष्ट्रवाद, धर्मांतर बंदी, आर्थिक संरक्षण धोरण इत्यादी मुद्द्यांच्या आधारावर राजकारण करून कॉंग्रेसला आव्हान देण्याचा प्रयत्न करण्यात आला. या काळात भाजपाने जनआधार मिळविण्यात यश आले.

## जमातवादी भूमिका:-

1989 नंतर भाजपाने जमातवादी भूमिकेचा स्वीकार केला त्यात

i) विश्वहिंदू परिषद, बजरंग दलांचा आधार घेतला.

ii) धर्मवादी नेते भाजपाच्या तिकिटावर निवडणूक लढू लागले

iii) हिंदू राष्ट्रप्रेमी लोक पक्षाचा प्रचार करीत

(iv) अयोध्या प्रकरण - रामजन्मभूमीचा आधार घेऊन लोकांच्या धार्मिक भावनांना आवाहन करून राजकारण करण्याचा प्रयत्न

(v) रामशिलापूजेचा कार्यक्रम, महाआरत्यांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला

(vi) सप्टेंबर 1990 मध्ये अडवाणींनी सोमनाथ मंदिरापासून रथयात्रा सुरू करून 10,000 K.M प्रवास करून ती अयोध्येला आणली. यावेळी रथाला स्त्रियांनी ओवाळले, कपाळावर टिळक लावले, सर्वत्र भगवी लहर, हिंदू देवतांच्या मूर्ती लावले, आरत्या करणे इत्यादींचे नियोजन पूर्वक कृती करण्यात आली

(vii) उमा भारती, आणि साध्वी ऋतंभरा यांनी मुस्लिम अल्पसंख्याकांविरुद्ध गरळ ओकणारी आगलावी भाषणे यामुळे हिंदूंचे ध्रुवीकरण होऊन मुस्लिम समाजविरोधी द्वेष करण्यात आला

(viii) बाबरी मशीद प्रकरण :-

अयोध्या हे हिंदूंचे पवित्र स्थान आहे आणि तेथेच रामाचा जन्म झाला. राममंदिर तेथेच होते परंतु बाबरच्या आगमनाने बाबराने राममंदिर पाडून तेथे बाबरी मशीद बांधली हा हिंदूंचा अपमान आहे त्यामुळे परत बाबरी मशीद पाडून त्या ठिकाणी मंदिर बांधणे आवश्यक आहे असा प्रचार केला. त्याचा परिणाम म्हणून हिंदू - रामभक्तांनी 6 डिसेंबर 1992 ला मशीद पाडली - सर्वत्र दंगली उसळल्या. यावेळी इस्लाम धर्म मूलतः आक्रमक व असहिष्णू असून हिंदू [illegible] सांगितले गेले.

## 1996 ते 2003 पर्यंत :

1996, 1998, 1999 च्या निवडणुकांमध्ये भाजपा राष्ट्रीय पातळीवर प्रभावी पक्ष बनला. 1999 पासून ते 2004 पर्यंत अनेक पक्षांच्या केंद्रात भाजपाची सत्ता होती. 2003 च्या पाच राज्यात झालेल्या निवडणुकांत भाजपाने काँग्रेसकडून सत्ता आपल्याकडे खेचल्याने तीन राज्यात यश मिळविले त्यामुळे भाजपाचो मनोधैर्य वाढले. भाजपाने आपला कार्यकाळ संपण्या अगोदर सहा महिन्यांनी निवडणुका जाहीर केल्या. पण अपेक्षेप्रमाणे जास्त जागा मिळाल्या मात्र 138 जागांवर समाधान मानावे लागले.

1996 च्या जाहीरनाम्यात मुद्दे -

स्वदेशीचा स्वीकार, महिलांना 33% आरक्षण, स्वाराज्य, इत्यादि

2004 च्या निवडणूक प्रचारातील मुद्दे :-

या निवडणुकांत भाजपाने आपण केलेल्या प्रगतीचा मिडियामधून, आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून प्रचार करण्यावर भर दिला. भारताची सर्वांगीण प्रगती झालेली आहे (फील गुड) गेल्या पाच-सहा वर्षात भारताने दैदिप्यमान प्रगती केली आहे (शायनिंग इंडिया) ही भाजपाच्या निवडणूक प्रचारातील मुद्दे होती, तसेच सोनिया गांधी परकिय आहेत, सांस्कृतिक राष्ट्रवाद, वाजपेयींची अणुचाचणी स्फोट, हेही मुद्दे होते.

## मुख्य आधार सांस्कृतिकरण :-

भाजपाने अनेक पक्षांना सहभागी घेऊन या संयुक्त सरकार चालविताना, भाजपा धोरणात बदल केला, तर राममंदिर प्रश्नापासून, व्यापारीकरणावर भर, जागतिकीकरण, सर्वधर्मिय तडजोडवादी भूमिका स्वीकारली होती असे असले तरी नरेंद्र मोदींचे गुजरातमध्ये भाजपाचा आधार हा हिंदू धर्मीय आहे हे स्पष्टपणे दिसते त्यामुळे आजही भाजपाचा मुख्य आधार सांस्कृतिकरण आहे

## भाजपाच्या मर्यादा :-

i) रा. स्वयं संघाच्या नियंत्रणाखाली भूमिका बजावेल.

ii) तत्वविचार व कार्यक्रम यावर आधारित संघटन राजकीय पक्ष अशी आपली प्रतिमा तो तयार करु शकला नाही

iii) स्वच्छ व चारित्र्यसंपन्न पक्ष नाही

iv) जमातवादी पक्ष म्हणून ओळख स्थानी

v) भ्रष्टाचार, गटबाजी, नेतृत्वाचे भांडे, सत्तासंघर्ष हे प्रकार उघडकीस

vi) भूमिका तडजोडीची व धरसोडीची होती

vii) आर्थिक धोरण तर भारत दिशाहीन होते